सूचना का अधिकार

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
बृहन्मुंबई खंडपीठ

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्र. MHSICMU/२०२२/M/००२२०८

अपिलार्थी श्री. अरूण मुरलीधर बेळे

विरुद्ध

जन माहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक (डब्ल्यू)
गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, गृहनिर्माण भवन,
कलानगर, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.

प्रथम अपिलीय अधिकारी
गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, गृहनिर्माण भवन,
कलानगर, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.

द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १२.०१.२०२३

अपीलकर्ता : उपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : उपस्थित

मूळ अर्ज दिनांक	जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक	प्रथम अपील दिनांक	प्रथम अपील आदेश दिनांक
०१.०२.२०२२	०२.०२.२०२२/१७.०२.२०२२	२९.०३.२०२२	-

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. २०.०६.२०२२ रोजीच्या अर्जान्वये खालील कारण नमुद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे:-

"माहिती अधिकारी यांनी मागितलेली माहिती न दिल्यामुळे दि. २९.०३.२०२२ रोजी प्रथम अपील केले. परंतु माहिती न देता मा. उपमुख्य अधिकारी (पश्चिम), मुंबई मंडळ यांचेकडे पत्र दिले. त्यांनी ही माहिती न दिल्यामुळे सबब हे दुसरे अपील करत आहे."

अपिलार्थी यांनी त्यांचा अर्ज दि. ०१.०२.२०२२ अन्वये खालील माहिती विचारलेली आहे:-

"म्हाडामार्फत जागतिक बँक प्रकल्पांतर्गत ३० वर्षापूर्वी वाटप केलेल्या भूखंडाबाबत.

१) ३० वर्षाचे अगोदर म्हाडाचे जागतिक बँक प्रकल्पांतर्गत काही निवासी भूखंड गृहनिर्माण संस्थांना वाटप केलेले आहेत त्यांची माहिती. तसेच काही भूखंडाचा गैरवापर झालेला आहे. या सर्वांची माहिती हवी आहे.

२) वाटप भूखंडाचे वाटप रद्द करण्यासाठी म्हाडाचे मुंबई मंडळाने २५ प्रस्ताव पाठविले होते. त्यापैकी किती भूखंडाचे (नावासह) वाटप रद्द केले आहे. तसेच किती भूखंड आपले कार्यालयाने परत ताब्यात घेतले आहेत याची माहिती हवी आहे."

अपील क्र. MHSICMU/२०२२/M/००२२०८

अपिलार्थी यांनी त्यांच्या व्दितीय अपील अर्जासोबत जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि. १७.०२.२०२२ संलग्न केलेले आहे.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे पत्र दि. १७.०२.२०२२ अन्वये अपिलार्थींना खालीलप्रमाणे उत्तर दिलेले आहे:-

"आपण मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची आहे. आपणास आवश्यक असलेल्या विशिष्ट भुखंड अथवा सहकारी गृहनिर्माण संस्थेचा नावासह उल्लेख आपण आपल्या माहिती अधिकार अर्जात करावा किंवा आपणास आवश्यक असलेल्या माहितीचा संदर्भ कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी ११.०० ते दु. ३.०० वाजेपर्यंत उपस्थित राहून कळवावा. तदनंतरच आपल्या माहिती अधिकार अर्जावर पुढील कार्यवाही करणे शक्य होईल, कृपया याची नोंद घ्यावी."

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित असून विचारलेवर अपिलार्थी यांनी असे सादर केले की, त्यांनी माहितीची मागणी केली होती. कार्यालयात उपस्थित राहून संस्थाचे नाव, इत्यादी कळवावे या प्रकारचे उत्तर योग्य नाही. जन माहिती अधिकारी यांनी असे सादर केले की, ज्याअर्थी विचारलेली माहिती विस्तृत स्वरुपाची आहे, या कारणामुळे कार्यालयात उपस्थित राहून संस्थाचे नाव देवून माहिती प्राप्त करावी असे सूचित करण्यात आले होते.

या प्रकरणी अपिलार्थी यांनी ३० वर्षापूर्वी जागतिक बँक प्रकल्पांतर्गत निवासी भूखंड गृहनिर्माण संस्थांना वाटप यासंबंधीची यादी, भूखंडचा गैरवापर झाला याबाबतची माहिती, भूखंड रद्द करण्यात आले यासंबंधीची माहिती किंवा भूखंड पुन्हा ताब्यात घेण्यात आला यासंबंधीची माहितीची मागणी केली आहे.

सुनावणीच्या वेळी उपस्थित जन माहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक (डब्ल्यु) मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ यांनी असे सादर केले की, जागतिक बँक प्रकल्प अंतर्गत गृहनिर्माण संस्था, HIG, ६० मीटरचे भूखंड व १०० मीटरचे भूखंड वाटप करण्यात आले. त्याचे अखत्यारखाली ९०० भूखंड गृहनिर्माण संस्थेला व ४०० भूखंड HIG category मध्ये, १०० चौरस मीटरचे १००० भूखंड व ६० चौरस मीटरचे १००० भूखंड वाटप करण्यात आले आहे.

वाटप करण्यात आलेले भूखंडची यादी सार्वजनिक आहेत किंवा कसे व त्यापैकी वाटप केलेले भूखंड रद्द केलेले यासंबंधीची यादी सार्वजनिक आहे किंवा कसे, असे विचारल्यावर सादर करण्यात आले की, ही माहिती सार्वजनिक नाही. ही माहिती सार्वजनिक करू शकेल का? असे विचारलेवर जन माहिती अधिकारी यांनी असे सादर केले की, ही माहिती सार्वजनिक करणे शक्य आहे.

सुनावणीच्या वेळी असे निर्देशनास आले की, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ मध्ये २ उपमुख्य अधिकारी आहेत व प्रत्येक उपमुख्य अधिकारी यांचे अखत्यार खाली वेगवेगळे क्षेत्रासाठी मिळकत व्यवस्थापक आहे. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक (डब्ल्यु) हे उपस्थित होते. कारण व्दितीय अपील अर्जामध्ये त्यांना प्रतिवादी करण्यात आलेले आहे. एका क्षेत्रिय अधिकारीची माहिती प्रकाशित करणे व त्याबाबतचे आदेश देणे योग्य नसल्यामुळे या प्रकरणावर सुनावणी

अपील क्र. MHSICMU/२०२२/M/००२२०८

रोखून ठेवण्यात आली व मध्यांतरानंतर सुनावणी पुन्हा घेण्यात आली व त्यावेळी प्रशासकीय अधिकारी व सचिव, मुंबई मंडळ, उपमुख्य अधिकारी पुर्व व पश्चिम तेही उपस्थित होते. चर्चेमध्ये प्राप्त झालेली माहिती प्रमाणे जागतिक प्रकल्प अंतर्गत वाटप झालेले भूखंडची माहिती मुंबई मंडळच्या मुख्यालयाव्दारे पूर्ण मुंबईसाठी प्रकाशित करणे योग्य राहिल. यामध्ये भूखंडचा क्रमांक, ज्या संस्थाला किंवा व्यक्तीला वाटप केले त्याचे नाव, भूखंड रद्द केलेला असेल त्यासंबंधीची माहिती व जे भूखंड परत घेतला असेल त्यासंबंधीच्या माहितीचा समावेश करुन माहिती प्रकाशित करणे व अद्ययावत करणे योग्य राहिल. वरील कारणामुळे जन माहिती अधिकारी तथा सचिव मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ यांनी जागतिक बँक प्रकल्प अंतर्गत गृहनिर्माण संस्था किंवा ज्या व्यक्ती यांना भूखंडचे वाटप केले आहे त्यांची वरीलप्रमाणे माहिती ४५ दिवसांत प्रकाशित करण्याबाबत व माहिती वेळोवेळी अद्ययावत करण्याबाबत कारवाई करावी.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग पुढील आदेश देत आहे:

आदेश

वरील निर्देशानुसार अपील निकाली काढण्यात येत आहे.

State Information Commission Greater Mumbai

सुनील पोरवाल

(सुनील पोरवाल)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई

मुंबई
दिनांक : १७.०१.२०२३

प्रत:- सचिव, मुंबई मंडळ, गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, गृहनिर्माण भवन, बांद्रे, मुंबई.

राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई